सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in,Phone No.: 020-25621440

परिपत्रक क्र. ७३०/२०२६

सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, परीक्षेच्या कालावधीमध्ये जे विद्यार्थी आंतरविद्यापीठीय, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील सांस्कृतिक व क्रीडास्पर्धा अथवा इतर कार्यक्रमांमध्ये सहभागी होणारे / झालेले असतील तसेच राष्ट्रीय सेवायोजना व राष्ट्रीय छात्रसेना योजना यामध्ये सहभागी होणारे / झालेले असतील अशा खालील पात्र विद्यार्थ्यांची महाविद्यालयाच्या पडताळणी व शिफारशी नंतर परीक्षा आयोजनाची पर्यायी व्यवस्था करण्यात येते.

१. ज्या विद्यार्थी खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवरील आशियाई किंवा ऑलिंपिक स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.
२. राज्यस्तरीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर तसेच राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, वादविवाद स्पर्धा अशा मा. व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्य केलेल्या स्पर्धेमध्ये सहभागी होणारे/झालेले विद्यार्थी.
३. राष्ट्रीय शारिरीक कार्यक्षमता व विद्यापीठाचे प्रौढ शिक्षण कार्यक्रम या स्पर्धांमध्ये सहभागी होणारे/झालेले विद्यार्थी.
४. मा. कुलपती यांनी वेळोवेळी निर्देशित केलेल्या स्पर्धा (उदा. इंद्रधनुष्य, अश्वमेघ, आविष्कार इ.) तसेच अखिल भारतीय विश्व विद्यालय संघ, नवी दिल्ली व केंद्र शासन व राज्य शासन यांनी आयोजित केलेल्या सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होणारे/झालेले विद्यार्थी.
५. तसेच समकक्ष विषय व इतर कारणांमुळे एकाच दिवशी, एकाच वेळेस दोन विषयांची परीक्षा येत असल्यास.
६. केंद्रिय प्रवेश प्रक्रिया राष्ट्रीय पात्रता चाचणी, राज्यस्तरीय पात्रता चाचणी इत्यादी तत्सम परीक्षा व विद्यापीठ परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास.

उपरोक्त नमूद पात्र असणाऱ्या व परीक्षा अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा आयोजनाबाबत पर्यायी व्यवस्था म्हणून विशेष परीक्षांचे आयोजन करण्यात येते. यासाठी आतापर्यंत पारंपारिक पध्दतीने अर्ज संबंधित महाविद्यालये / परिसंस्थेच्या मार्फत भरून घेण्यात येत होते. सदरची प्रक्रिया यापुढे ऑनलाईन करण्यात येत आहे. ही प्रक्रिया करतांना सर्व मा. प्राचार्य/ संचालक यांनी संबंधित अभ्यासक्रमांची परीक्षा संपल्यानंतर प्राधान्यक्रमाने दहा दिवसांच्या आत संबंधित विद्यार्थ्यांचे विशेष परीक्षा आयोजनाचे अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरून परीक्षा विभागास विहित मुदतीत सादर करावेत. सदर अर्ज महाविद्यालयाकडे जमा करावेत. महाविद्यालयांनी सदर विद्यार्थी व ज्या कारणे परीक्षेस बसणार आहे, याची खातरजमा करून, पात्र असल्यासच विद्यापीठाकडे आपल्या लॉगीन मधुन शिफारस करावी. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जानुसार केवळ पात्र विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा आयोजित करण्यात येईल व त्याबद्दल वेळोवेळी संबंधित महाविद्यालय व विद्यार्थी यांना अवगत करण्यात येईल. अशा विशेष परीक्षार्थींची संख्या ही अत्यंत

मर्यादित असलेने, अशा परीक्षा समुह केंद्र / विद्यापीठ येथे त्या वेळच्या प्रशासकीय निर्णयानुसार आयोजित करण्यात येतील. काही परिस्थितीत अशा परीक्षा या सुट्टीच्या दिवशी / रविवारी देखील आयोजित करण्यात येतील, याची नोंद घ्यावी. सातत्यपूर्ण अंतर्गत मुल्यमापन, प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षांसाठी विशेष परीक्षा आयोजित करण्यात येत नाहीत, याची नोंद यावी.

या संदर्भातील माहिती पुस्तिका (User Manual) https://sps.unipune.ac.in/app/ या लिंकवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच परीक्षेच्या शेवटच्या दिवसापासून १० दिवसाच्या आत ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे. ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यात येणार नाही. उपरोक्त आशयाची यापुर्वीची सर्व परिपत्रके निरसीत करण्यात येत आहेत.

मा. प्राचार्य / संचालक / महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील सुचनांचे अवलोकन करून याबाबत सर्व संबंधितांना आपल्या स्तरावरून सुचित करावे.)

(डॉ. राजेंद्र तलवारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

परीक्षा समन्वय कक्ष, परीक्षा विभाग)
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.)
जा.क्र. १३४४, दिनांक: ०५/११/२०२६)